
ePaper
भारताबाहेर गेलेले ढग परतू लागले! उत्तराखंडमध्ये 'रेड अलर्ट

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™






नैसर्गिक आपत्तीवर राजकारण थांबवा!


WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 14 जुलै 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## २७ जणांचा होरपळून मृत्यू, ६३ गंभीर जखमी

# थायलंडची राजधानी बँकॉकमध्ये अग्नितांडव

**महाईन्यूज । बँकॉक**

**थायलंडची राजधानी बँकॉक येथील एका लोकप्रिय पबमध्ये रविवारी मध्यरात्रीनंतर भीषण आग लागून २७ जणांचा होरपळून व गुदमरून मृत्यू झाला, तर ६० हून अधिक जण गंभीर जखमी झाले. जखमींवर विविध रुग्णालयांत उपचार सुरू असून अनेकांची प्रकृती चिंताजनक असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.**



उत्तर बँकॉकमधील चातुचक परिसरातील 'रॉंग बीअर ना लात फ्राव' या लोकप्रिय पबमध्ये मध्यरात्री सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास आग लागली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, स्टेजजवळील मुख्य सर्किट ब्रेकरमधून प्रथम धूर निघताना दिसला. काही क्षणांतच मोठा स्फोट झाला आणि संपूर्ण पबमध्ये वेगाने आग पसरली. त्यानंतर इमारतीत विषारी धुराचे साम्राज्य निर्माण झाल्याने अनेकांना बाहेर पडता आले नाही.

अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत सुमारे अर्ध्या तासात आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र, तोपर्यंत संपूर्ण इमारत जळून खाक झाली होती. मृतांमध्ये १८ महिला आणि ९ पुरुषांचा समावेश असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.


### यापूर्वीही अशा दुर्घटना

थायलंडमध्ये सुरक्षा नियमांकडे दुर्लक्ष झाल्याने यापूर्वीही अशा दुर्घटना घडल्या आहेत. २०२२ मध्ये एका म्युझिक पबला लागलेल्या आगीत १४ जणांचा मृत्यू झाला होता. तर २००९ मध्ये बँकॉकमधील सांतिका नाईटक्लबमध्ये फटाक्यांमुळे लागलेल्या भीषण आगीत ६६ जणांचा मृत्यू आणि २०० हून अधिक जण जखमी झाले होते.


### नेमकं काय घडलं?

उत्तर बँकॉकच्या चातुचक भागातील अत्यंत लोकप्रिय असलेले रॉंग बीअर ना लात फ्राव हे रेस्टॉरंट आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. अग्निशामक दलाला सोमवारी मध्यरात्री १२ च्या सुमारास या पबमध्ये आग लागल्याची माहिती मिळाली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, पबमध्ये अचानक स्टेजजवळ असलेल्या मुख्य सर्किट ब्रेकरमधून धूर निघताना दिसला. त्यानंतर काही सेकंदांतच तिथे मोठा स्फोट झाला. या स्फोटानंतर पबमध्ये सर्वत्र आग भडकली आणि संपूर्ण इमारतीत विषारी धूर पसरला. अग्निशामक दलाच्या जवानांनी जवळपास अर्ध्या तासातच आगीवर नियंत्रण मिळवले, पण तोपर्यंत संपूर्ण इमारत जळून खाक झाली होती. या दुर्घटनेत मृत्यू झालेल्यांमध्ये १८ महिला आणि ९ पुरुषांचा समावेश आहे.





### टॉयलेटमध्ये आसरा घेतला; गुदमरून मृत्यू



थायलंडचे पंतप्रधान अनुतीन चर्नविराकुल यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला तसेच जखमींची रुग्णालयात जाऊन विचारपूस केली. आग लागल्यानंतर मुख्य प्रवेशद्वाराकडे नागरिकांची एकच झुंबड उडाली. दाट धूर आणि गोंधळामुळे अनेकांना बाहेर पडण्याचा मार्ग सापडला नाही. जीव वाचवण्यासाठी काहीजण इमारतीच्या मागील बाजूस असलेल्या टॉयलेटमध्ये लपले; मात्र विषारी धुरामुळे त्यांचा गुदमरून मृत्यू झाला. सर्वाधिक मृतदेह याच भागातून बाहेर काढण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

# भाजपच्या कुरघोडीमुळे मित्रपक्ष हैराण

## पुणे महापालिकेत भाजप बहुमताने सत्तेवर आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष विरोधात

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे महापालिकेत भाजप बहुमताने सत्तेवर आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्ष विरोधात आहे. मात्र, राज्यात महायुतीतील मित्रपक्ष म्हणून भाजपला पुण्यात 'राष्ट्रवादी'ला अनेक ठिकाणी सत्तेत वाटा द्यावा लागत आहे. त्यामुळे भाजप सातत्याने कुरघोडीचे राजकारण करत असल्याने मित्रपक्ष 'राष्ट्रवादी' हैराण झाला आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे भाजपच्या तक्रारींचे गाऱ्हाणे स्थानिक नेत्यांनी मांडल्यानंतर वरिष्ठ पातळीवरील नेत्यांची चर्चा होऊन मध्यस्थीने प्रश्न निकाली लागत नाही, तोच पुन्हा नव्याने कुरघोडी भाजपकडून करण्यात येत आहे. भाजपला उघडपणे विरोध करता येत नसल्याने तोंड दाबून बुक्क्यांचा मार सोसण्याची वेळ 'राष्ट्रवादी'वर आली आहे.**





पुणे महापालिकेत भाजपचे ११९ नगरसेवक असल्याने बहुमताने भाजप सलग दुसऱ्यांना सत्तेवर आहे. 'राष्ट्रवादी' विरोधी पक्ष आहे. राज्यात महायुतीतील हे दोन पक्ष सत्तेत आणि पुण्यात कागदोपत्री एकमेकांच्या विरोधात आहेत. विरोधी पक्ष म्हणून 'राष्ट्रवादी'कडून भाजपला उघडपणे विरोध करण्यात येत नसल्याचे दिसून येते. महापौर पदाच्या निवडणुकीतही 'राष्ट्रवादी'ने उमेदवार उभा केला नाही. 'राष्ट्रवादी'ची नमती भूमिका असताना भाजप मात्र सातत्याने कुरघोडीचे राजकारण करत आले आहे.

महापालिकेत सत्तेवर आल्यानंतर पहिल्या अर्थसंकल्पात भाजपने त्यांचे नगरसेवक असलेल्या प्रभागांना किमान पाच कोटी रुपये निधी मिळेल, अशी व्यवस्था केली. मात्र, राज्यात मित्रपक्ष असलेल्या 'राष्ट्रवादी'च्या नगरसेवकांना तुटपुंजा निधी दिला. त्यावरून भाजप-राष्ट्रवादीत वाद निर्माण झाला. तेव्हा 'राष्ट्रवादी'च्या स्थानिक नेत्यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे तक्रार केली. त्यानंतर त्यांना समाधानकारक निधी मिळू शकला. पुणे महापालिकेच्या १५ प्रभाग समिती अध्यक्षपदांच्या निवडीप्रक्रियेच्यावेळी भाजपने क्षेत्रीय कार्यालयांच्या रचनेत फेरबदल केला. त्यामुळे 'राष्ट्रवादी'ला एकच प्रभाग समिती अध्यक्षपद मिळाले. याबाबतही स्थानिक नेत्यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे तक्रार केली.

### नगरपरिषदेतही भाजपचे राजकारण

पुणे शहरात समाविष्ट असलेल्या फुरसुंगी आणि उरुळी देवाची ही गावे वगळून नगर परिषद तयार करण्यात आली. त्यामागे शिवसेना (शिंदे) पक्षाचे पुरंदरचे आमदार विजय शिवतारे यांची प्रमुख भूमिका होती. या नगर परिषदेच्या पहिल्याच निवडणुकीत सत्ता काबीज करून या भागावर प्रभुत्व राखण्याचे मनसुबे भाजपने आखले होते. मात्र, या गावांतील मतदारांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला भरभरून मते दिल्याने आमदार शिवतारे आणि भाजपचा स्वप्नभंग झाला.

# जेजुरीत दिंडीतील ट्रकच्या धडकेत तीन वारकरी महिलांचा मृत्यू

**महाईन्यूज । पुणे**

**श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या दिंडीतील ट्रकच्या धडकेत तीन वारकरी महिलांचा मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना सासवड-जेजुरी रस्त्यावरील बेलसर टोलनाक्याजवळ सोमवारी सकाळी घडली. अपघातात चार वारकरी महिला गंभीर जखमी झाल्या. त्यांच्यावर जेजुरीतील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.**





### ७० वर्षीय ट्रकचालक ताब्यात; ताप, सर्दीसाठी औषधे घेतल्याचे उघड

'अपघातानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. ७० वर्षीय ट्रकचालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली. तेव्हा तो अत्यवस्थ होता. त्याने सर्दी, तापासाठी औषधे घेतली होती. दुसऱ्या वाहनाला ओलांडून जाण्याच्या प्रयत्नात त्याने ट्रक अचानक डाव्या बाजूला वळविला. ट्रकच्या धडकेत सात वारकरी महिला गंभीर जखमी झाल्या', अशी पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी दिली.

नंदा पवार (वय ६०, रा. कवलापूर, ता. मिरज, जि. सांगली), माधवी राजाराम सलगरे (वय ५५, रा. मालगाव, ता. मिरज, जि. सांगली), राश्री शंकर भोसले (वय ५५, रा. कसबे डिग्रज, ता. मिरज, जि. सांगली) अशी मृत्युमुखी पडलेल्या वारकरी महिलांची नावे आहेत. 'अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या तीन वारकरी महिला मूळच्या सांगली जिल्ह्यातील आहेत. अपघातात चार महिला गंभीर जखमी झाल्या असून, त्यांच्यावर जेजुरीतील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत', अशी माहिती पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी दिली.


पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यात असलेल्या रंगनाथ महाराज पोखरबिसीकर दिंडीतील ट्रक सासवड-जेजुरी रस्त्यावरुन सोमवारी (१३ जुलै) सकाळी साडेआठच्या सुमारास सासवड-जेजुरी रस्त्यावरुन निघाला होता. त्या वेळी श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा सासवडजवळ असलेल्या बोरावके मळा परिसरात होता. वारकरी आणि वाहनांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तात्पुरत्या स्वरुपात दुभाजक टाकण्यात आले होते. उजवी बाजू वाहनांसाठी ठेवण्यात आली होती. डावी बाजू पायी जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी निश्चित करण्यात आली होती. पालखी मार्गावर बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. त्या वेळी सांगली जिल्ह्यातील कसबे दिग्रज गावातील दिंडीत सहभागी झालेल्या सात वारकरी महिला वाहनांसाठी निश्चित केलेल्या मार्गिकेवर होत्या. बेलसर टोलनाक्याजवळ शिवदीप लॉजजवळ ट्रकने सात वारकरी महिलांना धडक दिली. अपघातात त्या गंभीर जखमी झाल्या. अपघातात गंभीर जखमी झालेल्या वारकरी महिलांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच तीन वारकरी महिलांचा मृत्यू झाला. अपघातात चार वारकरी महिलांवर जेजुरीतील खासगी रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक संदीपसिंग, उपविभागीय अधिकारी शिळीमकर यांनी घटनास्थळी भेट दिली.

# नैसर्गिक आपत्तीवर राजकारण थांबवा!

## २५-३० वर्षे शहराच्या राजकारणात सक्रीय असलेल्या नेत्यांना पर्यायी डेपो उभारणे जमले नाही..?

**महाईन्यूज । अविनाश आदक**

**मोशी कचरा डेपोवरील दुर्घटना ही केवळ एका डेपोवरील अपघात नाही; ती पिंपरी-चिंचवड शहराच्या कचरा व्यवस्थापनातील अनेक वर्षांच्या त्रुटींचे विदारक वास्तव समोर आणणारी घटना आहे. या दुर्घटनेत निष्पाप कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला, अनेक कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आणि संपूर्ण शहराच्या कचरा व्यवस्थापनाची साखळी विस्कळीत झाली. अशा वेळी सर्वप्रथम प्राधान्य असायला हवे ते बचावकार्य, मृतांच्या कुटुंबीयांना न्याय, जखमींना मदत आणि भविष्यात अशी दुर्घटना पुन्हा घडू नये यासाठी आवश्यक उपाययोजना. मात्र, दुर्दैवाने या घटनेनंतर राजकीय आरोप-प्रत्यारोपांना अधिक ऊत आल्याचे दिसून आले.**




लोकशाहीत प्रशासनाला प्रश्न विचारणे हे विरोधकांचे कर्तव्य आहे आणि उत्तर देणे ही सत्ताधाऱ्यांची जबाबदारी आहे. परंतु प्रत्येक नैसर्गिक आपत्ती किंवा दुर्घटनेला केवळ राजकीय फायद्या-तोट्याच्या चष्म्यातून पाहिले गेले, तर मूळ प्रश्न कायम बाजूलाच राहतात. मोशी दुर्घटनेतही तेच घडताना दिसत आहे. दोषारोप झाले, पत्रकार परिषदांचे सत्र झाले, निवेदने दिली गेली; पण शहराला या अवस्थेत आणणाऱ्या दीर्घकालीन नियोजनाच्या अपयशावर फारशी चर्चा होत नाही.

आज मोशी कचरा डेपोवरील कामकाज विस्कळीत होताच संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरातील कचरा व्यवस्थापन अक्षरशः कोलमडले आहे. अनेक भागांत घराघरांतून कचरा उचलला गेला नाही. रस्ते, चौक, सोसायट्यांबाहेर आणि सार्वजनिक ठिकाणी कचऱ्याचे ढिग साचले. दुर्गंधी, मोकाट जनावरांचा वावर आणि संभाव्य साथीच्या रोगांचा धोका निर्माण झाला. एका डेपोवरील अडचणीमुळे संपूर्ण शहर ठप्प होत असेल, तर हे केवळ दुर्घटनेचे नव्हे, तर व्यवस्थेच्या कमकुवतपणाचे लक्षण आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे, मोशी डेपो बंद पडताच महापालिकेला शहरातील अनेक ठिकाणी तात्पुरते कचरा साठवण्याची वेळ आली. कासारवाडी येथील कलासागर परिसर, कासारवाडी एसटीपी, पुनावळे येथील डी. वाय. पाटील पार्किंग, किवळे आदर्शनगर ट्रान्सफर स्टेशन, काळेवाडीतील एम्पायर ब्रिजखालील जागा, वाकडमधील कस्पटेवस्ती, पिंपळे गुरव नदीपात्र परिसर, नेहरूनगर पार्किंग, मोशी टोलनाका, भोसरी एमआयडीसी तसेच संविधान चौक संकलन केंद्र अशा अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढिग साठवले जात आहेत. म्हणजेच, मोशी डेपोवरील दुर्घटनेचा फटका आता शहराच्या कानाकोपऱ्यात पोहोचला आहे.

विशेष म्हणजे, यापैकी अनेक ठिकाणे दाट लोकवस्तीच्या मध्यभागी किंवा निवासी परिसरालगत आहेत. त्यामुळे ज्या नेत्यांनी मोशी दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर राजकीय भूमिका घेतल्या, त्यांच्या मतदारसंघांमध्ये किंवा परिसरातही कचरा साठवण्याची वेळ आली आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ मोशीपुरता मर्यादित राहिलेला नाही; तो संपूर्ण शहराचा झाला आहे.

यातून एकच गोष्ट स्पष्ट होते—शहराचा संपूर्ण कचरा एका डेपोवर अवलंबून ठेवण्याचा निर्णय वर्षानुवर्षे कायम राहिला. पिंपरी-चिंचवडची लोकसंख्या झपाट्याने वाढत गेली, दररोज निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण वाढत गेले; मात्र त्यानुसार विकेंद्रित कचरा प्रक्रिया प्रकल्प, बायोगॅस प्रकल्प, कंपोस्टिंग केंद्रे, आधुनिक ट्रान्सफर स्टेशन आणि आपत्कालीन पर्यायी व्यवस्था उभारण्याकडे अपेक्षित गांभीर्याने पाहिले गेले नाही.

गेल्या २५ ते ३० वर्षांत महापालिकेत विविध राजकीय पक्ष सत्तेत आले. अनेक लोकप्रतिनिधी निवडून आले, अनेक प्रशासकीय अधिकारी बदलले. त्यामुळे आजची परिस्थिती ही केवळ एका पक्षाची किंवा एका कालखंडाची चूक आहे, असे म्हणणे वास्तवाला धरून ठरणार नाही. ही दीर्घकाळ साचत गेलेल्या धोरणात्मक आणि प्रशासकीय अपयशाची परिणती आहे. त्यामुळे केवळ आजच्या सत्ताधाऱ्यांवर किंवा विरोधकांवर बोट दाखवून हा प्रश्न सुटणार नाही.

अर्थात, याचा अर्थ प्रशासनाची जबाबदारी संपते असेही नाही. दुर्घटना का घडली? सुरक्षा उपाय पुरेसे होते का? जोखीम व्यवस्थापनात त्रुटी होत्या का? संबंधित अधिकारी, कंत्राटदार किंवा जबाबदार व्यक्तींवर कारवाई झाली पाहिजे. निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. परंतु त्याचबरोबर शहराला एका डेपोवर अवलंबून ठेवणारी व्यवस्था कशी तयार झाली, याचाही तितकाच गंभीर आढावा घेणे गरजेचे आहे.

**To The Point**

मोशी दुर्घटनेने एक महत्त्वाचा धडा दिला आहे. पिंपरी-चिंचवडसारख्या वेगाने वाढणाऱ्या महानगराला आता केंद्रीकृत नव्हे, तर विकेंद्रित आणि वैज्ञानिक कचरा व्यवस्थापनाची गरज आहे. प्रत्येक प्रभागात स्थानिक प्रक्रिया केंद्रे, ओल्या कचऱ्यावर जागेवरच प्रक्रिया, सुक्या कचऱ्याचे प्रभावी वर्गीकरण, लेगसी कचऱ्याचे निर्मूलन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि आपत्कालीन पर्यायी व्यवस्था उभारल्याशिवाय अशा संकटांपासून शहराची सुटका होणार नाही.

नैसर्गिक आपत्ती कोणाच्याही हातात नसते. मात्र त्या आपत्तीचा राजकीय फायदा करून घेण्याची घाई आणि दीर्घकालीन उपायांकडे दुर्लक्ष करण्याची सवय निश्चितच आपल्या हातात असते. आज गरज आहे ती आरोप-प्रत्यारोपांची नाही, तर आत्मचिंतनाची. शहराच्या भविष्यासाठी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि तज्ज्ञांनी एकत्र बसून शाश्वत कचरा व्यवस्थापनाचा आराखडा तयार करण्याची हीच योग्य वेळ आहे.

कारण आज प्रश्न फक्त मोशी डेपोचा नाही; प्रश्न आहे संपूर्ण पिंपरी-चिंचवडच्या भविष्यातील कचरा व्यवस्थापनाचा. दोषारोपांपेक्षा आत्मचिंतन मोठे, राजकारणापेक्षा शहराचे हित मोठे आणि प्रतिक्रियेपेक्षा दीर्घकालीन नियोजन अधिक महत्त्वाचे आहे. मोशी दुर्घटनेतून मिळणारा हाच खरा धडा आहे.



# विरोधी पक्ष हरवलाय; शोधून देणाऱ्यास बक्षीस!



## भूमिका

**मुंबई महानगर प्रदेशात झालेल्या मुसळधार पावसाने प्रशासनाच्या नियोजनातील त्रुटी पुन्हा एकदा उघड केल्या. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, मीरा-भाईंदर, वसई-विरारसह अनेक शहरांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले. रस्ते, रेल्वे, वीजपुरवठा आणि दैनंदिन जीवन कोलमडून पडले.**



मात्र या गंभीर परिस्थितीत सत्ताधाऱ्यांसोबतच विरोधी पक्षाची निष्क्रियताही तितकीच ठळकपणे समोर आली. सरकारला जाब विचारणे, जनतेच्या प्रश्नांवर रस्त्यावर उतरून संघर्ष करणे आणि विधिमंडळात आक्रमक भूमिका घेणे हे विरोधी पक्षाचे मूलभूत कर्तव्य असते. दुर्दैवाने हे चित्र कुठेच दिसले नाही.

पूर्वी विरोधी पक्षाची भूमिका केवळ विधानांपुरती मर्यादित नव्हती. महागाई, भ्रष्टाचार किंवा जनहिताच्या प्रश्नांवर मोठ्या प्रमाणात आंदोलने होत असत. जनतेचा आवाज शासनापर्यंत पोहोचवण्यासाठी विरोधक सातत्याने रस्त्यावर उतरायचे.

आज मात्र पूरग्रस्त नागरिकांचे हाल, अनेक दिवस खंडित झालेला वीजपुरवठा, विस्कळीत वाहतूक आणि कोट्यवधी रुपयांच्या नुकसानीनंतरही विरोधी पक्षाकडून अपेक्षित तीव्रता दिसून आली नाही. जनतेच्या अडचणींपेक्षा राजकीय गणिते आणि स्वार्थ अधिक महत्त्वाचे ठरत असल्याची भावना निर्माण झाली आहे. महापालिका प्रशासनाची जबाबदारीही तितकीच मोठी आहे. नालेसफाईवर दरवर्षी शेकडो कोटी रुपये खर्च होतात.

तरीही प्रत्येक पावसात शहर जलमय होते. याचा अर्थ खर्च होतो; पण परिणाम दिसत नाही. नागरिकांना दर्जेदार रस्ते, सक्षम जलनिस्सारण व्यवस्था, स्वच्छता आणि सुरक्षित पायाभूत सुविधा देण्यात पालिका वारंवार अपयशी ठरत आहेत. या अपयशाची जबाबदारी केवळ अधिकाऱ्यांवर टाकून चालणार नाही; त्यासाठी लोकप्रतिनिधींनाही उत्तरदायी ठरवावे लागेल. लोकशाहीमध्ये सत्ताधारी आणि विरोधक हे एका नाण्याच्या दोन बाजू असतात. सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवण्याचे काम विरोधी पक्षाने केले नाही, तर प्रशासन अधिक बेफिकीर होते. आज नेमके तेच घडताना दिसत आहे. सरकारच्या चुका दाखवून देणे, पर्यायी उपाय मांडणे आणि जनतेच्या हक्कासाठी संघर्ष करणे ही विरोधकांची खरी ओळख असली पाहिजे. ती हरवली, तर लोकशाही कमकुवत होते.

महामुंबईतील अलीकडील पूरस्थितीने प्रशासनाच्या अपयशाबरोबरच विरोधी पक्षाच्या निष्क्रियतेवरही प्रश्नचिन्ह उभे केले आहे. नागरिकांना केवळ आरोप-प्रत्यारोप नव्हे, तर प्रभावी नेतृत्व आणि उत्तरदायी राजकारण हवे आहे. अन्यथा "विरोधी पक्ष हरवलाय, शोधून देणाऱ्यास बक्षीस" ही उपरोधिक टिप्पणी वास्तव ठरेल आणि त्याची सर्वात मोठी किंमत सामान्य नागरिकांनाच मोजावी लागेल.

## प्रासंगिक »

### एक हाताची टाळी

**एका वनातील आश्रमात एक संत आणि त्यांच्यासोबत एक अनाथ मुलगा राहत होता. मुलाला ध्यानसाधना शिकायची इच्छा होती. संतांनी त्याचा हट्ट पाहून दोन्ही हातांनी टाळी वाजवली आणि म्हणाले.**

"हा दोन हातांच्या टाळीचा आवाज आहे. आता एका हाताच्या टाळीचा आवाज शोधून ये. "मुलगा अनेक वर्षे जंगलात विविध आवाज ऐकत राहिला. कधी पानांची सळसळ, कधी पक्ष्यांचा किलबिलाट, तर कधी वाऱ्याचा मंद आवाज त्याला एका हाताच्या टाळीचा आवाज वाटे. पण संत प्रत्येक वेळी म्हणत, "हा तो आवाज नाही, आणखी शोध घे."

असा शोध घेत घेत मुलगा मोठा झाला. एके दिवशी तो गुरुंसमोर शांतपणे बसला, डोळे मिटले आणि गहन ध्यानात लीन झाला. त्याचे मन पूर्णपणे स्थिर झाले. गुरुंनी त्याच्याकडे पाहून स्मित केले. त्यांना कळले की शिष्याला आता बाह्य आवाज नव्हे, तर अंतर्मनातील शांततेचा खरा अनुभव मिळाला आहे.

-तात्पर्य: ध्यान म्हणजे बाह्य आवाजांचा नव्हे, तर मनाच्या पूर्ण एकाग्रतेचा आणि योग्य गुरुच्या मार्गदर्शनातून मिळणाऱ्या अंतःशांतीचा अनुभव होय.

महाराष्ट्र सरकारने प्रस्तावित केलेले नवीन 'क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट' विधेयक राज्यातील आरोग्यसेवा अधिक पारदर्शक, जबाबदार आणि रुग्णकेंद्रित करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल आहे.

# सर्वांसाठी समान नियम, तेव्हाच रुग्णहित सुरक्षित!



खासगी रुग्णालयांमध्ये वाढणारी मनमानी शुल्क आकारणी, अपुऱ्या सुविधा आणि नियमभंगावर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर कायद्याची आवश्यकता होती. मात्र, या विधेयकातील सर्वात मोठा प्रश्न म्हणजे शासकीय रुग्णालयांना त्यातून मोठ्या प्रमाणात सूट देण्यात आली आहे.

खासगी रुग्णालयांसाठी रुग्णखाटांमधील अंतर, स्वच्छतागृहे, स्नानगृहे, जागेचे निकष, अतिदक्षता विभागातील सुविधा आणि विविध सेवा अनिवार्य करण्यात आल्या आहेत. परंतु याच नियमांची अंमलबजावणी शासकीय रुग्णालयांवर बंधनकारक नसल्याने समानतेच्या तत्त्वावर प्रश्नचिन्ह निर्माण होते. सरकारी रुग्णालयांतील गर्दी, अपुरी यंत्रणा आणि मूलभूत सुविधांचा अभाव सर्वश्रुत आहे. अशा परिस्थितीत दोन वेगवेगळ्या निकषांवर आरोग्य व्यवस्था चालवणे न्याय्य ठरणार नाही.

कायदा प्रभावी असण्यासाठी त्याची काटेकोर अंमलबजावणी आवश्यक असते. २०२१ च्या सुधारित नियमावलीचे अपयश हे अंमलबजावणीतील शिथिलतेमुळेच आले. शुल्कफलक न लावणे, रुग्णांना आवश्यक कागदपत्रे न देणे, अपुऱ्या पात्रतेच्या कर्मचाऱ्यांकडून सेवा घेणे, अग्निसुरक्षेकडे दुर्लक्ष करणे यांसारखे प्रकार आजही सुरू आहेत. त्यामुळे केवळ नवीन कायदा करून उपयोग नाही; त्याची कठोर अंमलबजावणी आणि नियमित तपासणी तितकीच आवश्यक आहे. आरोग्य क्षेत्रातील विविध वैद्यकीय परिषदांनीही केवळ व्यावसायिकांचे संरक्षण न करता रुग्णहिताला सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे. नवीन परिषद केवळ नावापुरती न राहता जबाबदारी निश्चित करणारी आणि दोषींवर कारवाई करणारी संस्था बनली, तरच या विधेयकाचे खरे उद्दिष्ट साध्य होईल.

रुग्ण हा सरकारी असो किंवा खासगी रुग्णालयातील, त्याचा सुरक्षित आणि दर्जेदार उपचार हा समान अधिकार आहे. त्यामुळे कायद्याचे निकषही सर्वांसाठी समान असले पाहिजेत. अन्यथा हे विधेयक न्यायालयात टिकेल का, हा प्रश्न कायम राहील. आरोग्य व्यवस्थेतील विश्वास पुनर्स्थापित करण्यासाठी सरकारने दुहेरी निकष टाळून पारदर्शक, समान आणि प्रभावी अंमलबजावणीवर भर देणे, हीच काळाची गरज आहे.

## ।। अभंगवाणी ।।



सुखें वोळंब दावी गोहा।
माझें दुख नेणा पाहा ॥१॥

आवडीचा मारिला वेडा।
होय होय कैसा म्हणे भिडा ॥धृ.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सावधान! मतदार ओळखपत्र रद्द होणार?

## व्हायरल मेसेजवर विश्वास ठेवू नका, निवडणूक आयोगाचा मोठा खुलासा




### तथ्य पडताळणी : निवडणूक आयोगाचा खुलासा

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्याकडून या व्हायरल मेसेजची गंभीर दखल घेण्यात आली आहे. त्याची सत्यता तपासल्यानंतर हा संपूर्ण प्रकार एक फसवणूक असल्याचे स्पष्ट झाले आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या माहितीनुसार, 'व्हायरल मेसेजमधील दावा पूर्णपणे खोटा आहे. भारत निवडणूक आयोग किंवा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांनी असा कोणताही मेसेज किंवा व्हॉट्सअॅप क्रमांक जारी केलेला नाही,' असे स्पष्ट केले आहे. तसेच, 'निवडणूक आयोग (ECI) किंवा मुख्य निवडणूक अधिकारी (CEO) कोणत्याही मतदाराला वैयक्तिक रित्या व्हॉट्सअॅपवर अशा प्रकारच्या नोटीस अथवा धमक्यावजा संदेश पाठवून कागदपत्रांची मागणी करत नाहीत,' असाही खुलासा केला आहे.

**महाईन्यूज । मुंबई**

**सोशल मीडियाच्या युगात माहिती जितक्या वेगाने पसरते, तितक्याच वेगाने अफवा आणि फेक मेसेजही नागरिकांची दिशाभूल करण्यासाठी व्हायरल होत असतात. सध्या असाच एक प्रकार समोर आला आहे. यात भारत निवडणूक आयोग (ECI) आणि मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या नावाने WHATSAPP वर एक बनावट संदेश आणि मोबाईल क्रमांक मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे.**

या मेसेजद्वारे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण केला जात असून, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने त्यांच्या ChiefElectoralOffice या अधिकृत 'X' हँडलवरून महत्त्वपूर्ण माहिती दिली आहे.

सध्या व्हॉट्सअॅपवर फिरणाऱ्या या बनावट मेसेजमध्ये असा दावा करण्यात आला आहे की, 'विशेष सखोल पुनरीक्षण २०२६ (SIR-2026) दरम्यान मतदारांच्या कागदपत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर विसंगती किंवा त्रुटी आढळल्या आहेत. त्यामुळे संदेशात दिलेल्या विशिष्ट मोबाईल क्रमांकावर मतदारांनी त्वरित संपर्क साधावा. जर दिलेल्या वेळेत संपर्क केला नाही, तर मतदाराचे मतदार ओळखपत्र (Voter ID) मतदार यादीतून हटवले किंवा रद्द केले जाईल.' या मेसेजसोबत निवडणूक आयोगाचा लोगो आणि काही मोबाईल क्रमांक देखील जोडण्यात आले आहेत, ज्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना तो अधिकृत संदेश असल्यासारखा वाटू शकतो.

'व्हायरल होत असलेल्या या संदेशाची भाषा, त्याचे स्वरूप आणि त्यामध्ये करण्यात आलेला अधिकाऱ्यांचा उल्लेख हा निवडणूक आयोगाच्या अधिकृत आणि शासकीय पद्धतीशी अजिबात सुसंगत नाही. त्यामुळे हा संदेश सायबर गुन्हेगारांचे कृत्य असण्याची दाट शक्यता आहे,' अशी सतर्कता व्यक्त करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने मतदारांना सतर्क राहण्याचे आणि कोणत्याही प्रकारच्या फसवणुकीला बळी न पडण्याचे आवाहन केले आहे. निवडणूक आयोगाने म्हटलंय की, अशा कोणत्याही बनावट आणि संशयास्पद संदेशांवर नागरिकांनी अजिबात विश्वास ठेवू नये.

# तुकाराम मुंढेंचा हॉटेल आणि खाद्यपदार्थ विक्रेत्यांना पुन्हा इशारा

**महाईन्यूज । नागपूर**

**मुंबईसह संपूर्ण राज्यात सध्या अन्न व औषध प्रशासनाने (FDA) अन्न भेसळ आणि सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात मोठी मोहीम हाती घेतली आहे. या धडक कारवाई संदर्भात पीटीआयशी (PTI) बोलताना एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना कडक शब्दांत इशारा दिला आहे. "व्यवसाय छोटा असो वा मोठा, अन्नाचा दर्जा आणि सुरक्षेच्या नियमांशी तडजोड खपवून घेतली जाणार नाही," असे मुंढेंनी या वेळी स्पष्ट केले आहे.**



### आता 'अन्न सुरक्षा' पर्व

या वेळी तुकाराम मुंढे म्हणाले, "सर्वात आधी आपल्याला सरकार आणि आमच्या विभागाचा या कारवाईमागील दृष्टिकोन समजून घ्यावा लागेल. जुना 'अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा' आता इतिहासजमा झाला असून, त्याऐवजी २००६ मध्ये 'फूड सेफ्टी अँड स्टँडर्ड्स अॅक्ट' (FSSAI) अस्तित्वात आला आहे. २०११ पासून या कायद्याची देशभर अंमलबजावणी सुरू आहे. म्हणजेच, आपण आता केवळ भेसळ रोखण्याच्या काळात नाही, तर 'अन्न सुरक्षा आणि उच्च दर्जा' सुनिश्चित करण्याच्या युगात जगत आहोत."

FDA च्या या विशेष मोहिमेबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना आयुक्त तुकाराम मुंढे यांनी विभागाची भूमिका सविस्तर मांडली.

"अन्न व्यवसायाशी संबंधित आणि परवानाधारक असलेल्या प्रत्येकाने या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. मात्र, दुर्दैवाने अजूनही अनेक व्यावसायिक या अनिवार्य नियमांकडे आणि सुरक्षेच्या उपायांकडे दुर्लक्ष करत असल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे. याचा थेट परिणाम अन्न सुरक्षेवर आणि पर्यायाने सर्वसामान्यांच्या आरोग्यावर होतो. जनतेच्या आरोग्याशी खेळ सहन केला जाणार नाही, म्हणूनच आम्ही आता कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे," असे मुंढे यांनी सांगितले.

एफडीएच्या या धडक कारवाईमुळे मुंबईसह राज्यातील खाद्यपदार्थ विक्रेते आणि मोठ्या रेस्टॉरंट्सचे धाबे दणाणले असून, सर्वसामान्यांकडून मात्र या मोहिमेचे स्वागत केले जात आहे.

आम्ही मुंबईत आणि संपूर्ण महाराष्ट्रात व्यापक स्तरावर कारवाई सुरू केली आहे. त्याचे सकारात्मक परिणाम आता प्रत्यक्ष जमिनीवर दिसायला लागले आहेत. नियम मोडणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असे FDA चे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सांगितले आहे.

या विशेष मोहिमेत परवानाधारक हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, मिठाई दुकाने, बेकरी, खाद्यप्रक्रिया उद्योग तसेच स्ट्रीट फूड विक्रेत्यांचीही कसून तपासणी केली जात आहे. अन्नाची गुणवत्ता, स्वच्छता, परवान्यांची वैधता आणि अन्न सुरक्षा नियमांचे पालन याबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात दंडात्मक कारवाईसह परवाने निलंबित किंवा रद्द करण्याची प्रक्रियाही राबविण्यात येणार आहे. नागरिकांना सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार अन्न उपलब्ध करून देणे हेच या विशेष मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचेही आयुक्त तुकाराम मुंढे यांनी अधोरेखित केले. आगामी काळातही अशाच धडक तपासणी मोहिमा सातत्याने राबवून अन्न सुरक्षा नियमांची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल, असा इशाराही आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला.

# चीनचा रीयुजेबल रॉकेटचा प्रयोग यशस्वी

## थेट समुद्रातील जाळ्यात पकडला बूस्टर, SpaceX ची मक्तेदारी संपणार?

महाईन्यूज । चीन

**जागतिक अंतराळ क्षेत्रात एक मोठी महत्त्वाची घटना घडली आहे. चीनने प्रथमच पुनर्वापर करता येणाऱ्या म्हणजेच रीयुजेबल (REUSABLE) रॉकेटचे प्रक्षेपण करून ते यशस्वीरित्या परत मिळवलेदेखील. अमेरिकेची स्पेसएक्स (SPACEX) आणि ब्लू ओरिजिन (BLUE ORIGIN) या कंपन्यांच्या मक्तेदारीला यामुळे सुरुंग लागला असून एका नवीन अंतराळ स्पर्धेला प्रारंभ झाला आहे.**



चीनने प्रथमच पुनर्वापर करता येणाऱ्या रीयुजेबल (REUSABLE) रॉकेटचे यशस्वी प्रक्षेपण केले आणि त्यातील बूस्टर सुरक्षितपणे परत मिळवण्याचा प्रयोगही यशस्वी करून दाखवला. आतापर्यंत अशी क्षमता केवळ अमेरिकेतील SPACEX आणि BLUE ORIGIN या कंपन्यांकडे होती. आता चीननेही या अत्यंत गुंतागुंतीच्या तंत्रज्ञानावर प्रभुत्व मिळवले असून त्यामुळे जागतिक अंतराळ स्पर्धेने आता एक नवे वळण गाठले आहे, या प्रयोगासाठी २०२६ हे वर्ष निश्चितच लक्षात राहील. रॉकेटचे यशस्वी उड्डाण करून त्यातील बूस्टर परत मिळवण्यापुरतीच ही घटना मर्यादित नाही तर भविष्यातील चांद्रमोहिमा, हजारो उपग्रहांचे अंतराळातील जाळे, संरक्षण क्षेत्रातील वर्चस्व आणि अब्जावधी डॉलर्सच्या अंतराळ अर्थव्यवस्थेवर नियंत्रण मिळवण्याची स्पर्धा हे सारे घटक यामागे दडलेले आहेत.'

समुद्रातील एका विशेष तरंगत्या प्लॅटफॉर्मवर लटकवलेल्या जाळ्यात हा बूस्टर अचूकपणे पकडण्यात यश आले. हा प्रयोग यशस्वी झाल्यामुळे चीन जगातील रीयुजेबल रॉकेट विकसित करणाऱ्या अत्यंत मोजक्या देशांच्या यादीत दाखल झाला आहे.

रॉकेटचे प्रक्षेपण करणे हे एक आव्हान आहे; परंतु त्यापेक्षा अधिक कठीण म्हणजे ते पुन्हा सुरक्षित उतरवणे.

बूस्टर पृथ्वीच्या वातावरणात परत येताना जवळपास ध्वनीपेक्षाही अधिक वेगाने (सुमारे १,२२५ किमी प्रति तास) प्रवास करत असतो. त्यामुळे त्याला योग्य दिशा देणे, वातावरणातील घर्षणाचा सामना करणे, वेग कमी करणे आणि शेवटच्या काही सेकंदांत अचूक संतुलन राखणे आवश्यक असते. बूस्टर जवळपास रिकामा झालेला असल्यामुळे तो अत्यंत हलका असतो. त्यामुळे इंजिनने जास्त जोर दिल्यास तो पुन्हा वर जाऊ शकतो, तर कमी जोर दिल्यास तो कोसळू शकतो. या संपूर्ण प्रक्रियेला थ्रस्ट मॅनेजमेंट म्हणतात आणि रीयुजेबल रॉकेटमध्ये हेच सर्वात अवघड तंत्रज्ञान मानले जाते. त्याऐवजी रॉकेटवर विशेष LANDING HOOKS बसवलेले आहेत. समुद्रातील तरंगत्या प्लॅटफॉर्मवर स्टीलच्या वायरचे जाळे ताणले जाते. रॉकेट खाली येताना हे हुक त्या जाळ्यात अडकतात.

### रीयुजेबल रॉकेट म्हणजे काय?

सध्या उपग्रहांच्या प्रक्षेपणासाठी वापरली जाणारी बहुतांश रॉकेट्स ही एकदाच वापरता येतात. उड्डाणानंतर त्याचा पहिला टप्पा (FIRST STAGE किंवा BOOSTER) प्रचंड इंधन जाळून उपग्रहाला पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षण कक्षेतून बाहेर नेतो. त्यानंतर हा भाग वेगळा होऊन समुद्रात पडतो किंवा वातावरणात जळून नष्ट होतो. याउलट रीयुजेबल रॉकेटमध्ये हा महागडा बूस्टर पुन्हा पृथ्वीवर सुरक्षित परत आणला जातो, त्यानंतर दुरुस्ती करून तो पुन्हा पुढील मोहिमेसाठी वापरता येतो. या नव्या तंत्रज्ञानामुळे प्रक्षेपणाचा खर्च मोठ्या प्रमाणावर कमी होणार आहे. रॉकेटमधील सर्वात महागडा भाग म्हणजे त्याचे इंजिन आणि बूस्टर. तो प्रत्येक वेळी नव्याने तयार करण्याची गरज या नव्या तंत्रज्ञानामुळे भासणार नाही. याच तंत्रज्ञानामुळे SPACEX ने जगभरातील उपग्रह प्रक्षेपणाच्या बाजारपेठेत मोठी आघाडी घेतली आहे.

### चीनच्या Long March 10B ची कामगिरी


- चीनच्या LONG MARCH 10B या रॉकेटने दक्षिण चीनमधील हैनान प्रांतातील वेनचांग अंतराळ केंद्रावरून उड्डाण केले.
- हे रॉकेट लो अर्थ ऑर्बिट (LOW EARTH ORBIT) म्हणजे पृथ्वीपासून सुमारे १६० ते २,००० किलोमीटर उंचीपर्यंत तब्बल १६ मेट्रिक टन वजन वाहून नेऊ शकते.
- उड्डाणानंतर अवघ्या सहा मिनिटांत त्याचा बूस्टर मुख्य रॉकेटपासून वेगळा झाला आणि त्याने नियंत्रित पद्धतीने पृथ्वीकडे परतीचा प्रवास सुरू केला.

# भारताबाहेर गेलेले ढग परतू लागले! उत्तराखंडमध्ये 'रेड अलर्ट

महाईन्यूज । उत्तराखंड

**देशभरात मान्सूनचा वेग सध्या असमान पाहायला मिळत आहे. काही राज्यांमध्ये पावसाने विश्रांती घेतली असतानाच, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, पश्चिम बंगाल, ओडिशा आणि ईशान्य भारतामध्ये पुढील काही दिवस मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.**





उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक ठिकाणी भूस्खलनाच्या घटना घडल्या असून राज्यातील दोन राष्ट्रीय महामार्गांसह तब्बल १२६ रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. ऋषिकेश-यमुनोत्री राष्ट्रीय महामार्गावर दरड कोसळल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली असून यात्रेकरूंचे मोठे हाल होत आहेत.

राजस्थानच्या हवामानात पुढील काही दिवसांत मोठे बदल होणार आहेत. पूर्व राजस्थानमध्ये पुढील ५ ते ६ दिवस हवामान कोरडे राहण्याची शक्यता असली, तरी जयपूर, भरतपूर आणि शेखावाटी भागात १४ ते १५ जुलै दरम्यान हलका पाऊस पडू शकतो. मात्र, पश्चिम राजस्थानमध्ये ३० ते ४० किमी प्रतितास वेगाने धुळीचे वादळ घोंगावणार असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

पश्चिम बंगाल येथे गेल्या २४ तासांत जोरदार पाऊस झाला आहे. उप-हिमालयीन भागासह बांकुरा, बर्दवान, नादिया आणि मुर्शिदाबाद या दक्षिण जिल्ह्यांमध्ये १४ जुलैपर्यंत मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. ओडिशामध्ये पुढील चार दिवस विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. बालासोर, मयूरभंज, संबलपूरसह अनेक जिल्ह्यांसाठी 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. यंदा ओडिशात सामान्यपेक्षा ८ टक्के अधिक पावसाची नोंद झाली आहे.

राजधानी दिल्लीत पुढील सात दिवस तापमान स्थिर राहण्याची शक्यता असून कमाल तापमान ३५ ते ३६ अंश सेल्सिअसच्या आसपास राहील. उत्तर प्रदेशातही पुढील ३ ते ४ दिवस मोठ्या पावसाची शक्यता कमी आहे. यंदा उत्तर प्रदेशात मान्सून सरासरीपेक्षा १७ टक्के कमकुवत राहिला आहे.

### हिमाचल प्रदेशात पावसाचे सत्र सुरूच

हिमाचल प्रदेशातही हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू आहे. गेल्या २४ तासांत जोगिंदरनगरमध्ये सर्वाधिक ६० मिमी पावसाची नोंद झाली, तर मनालीमध्ये ४५ मिमी आणि शिमल्यात १९ मिमी पाऊस झाला. डोंगराळ आणि संवेदनशील भागात नागरिकांना सतर्क राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे. दरडी कोसळण्याचा आणि अचानक पूर येण्याचा धोका लक्षात घेता प्रशासन परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आहे.



अभिनेत्री दिशा पाटनीने बॉलीवूड चित्रपटानंतर आता हॉलीवूडमध्ये पदार्पण केले आहे. ती लवकरच 'हॉलीगाईस सागा – द पोर्टल ऑफ फोर्स' या चित्रपटातून हॉलीवूडमध्ये पाहायला मिळणार आहे. या चित्रपटात दिशा एका अत्यंत महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रसिद्ध अभिनेते, ऑस्कर विजेते केविन स्पेसी करत आहे. एका मुलाखतीत दिशा पटानीने केविन स्पेसी यांच्यासोबत काम करण्याचा आपला अनुभव शेअर केला. ती म्हणाली, "ते खरोखरच अप्रतिम आहेत. स्वतः एक अभिनेता असल्यामुळे ते आपल्या कलाकारांना खूप चांगल्या प्रकारे समजून घेतात. तेते आपल्या कलाकारांना मोकळेपणाने काम करण्याची आणि नवीन प्रयोग करण्याची संधी देतात. ते आम्हाला नेहमी सांगायचे की, आपण प्रत्येक सीनला आपल्या वैयक्तिक अनुभवांशी जोडून पाहिले पाहिजे."

## दिशा पाटनीचे हॉलीवूडमध्ये पदार्पण




## माँ इंटी बंगारम'चा सीक्वेल येणार

अलिकडेच प्रदर्शित चित्रपट 'मां इंटी बंगारम'चा सीक्वेल निर्माण केला जाणार आहे. याची पुष्टी चित्रपटाचे लेखक राज निदिमोरु यांनी दिली आहे. चित्रपटाचा दुसरा भाग येणार आहे. सीक्वेलमध्ये दुप्पट मजा आणि दुप्पट एक्साइटमेंट असेल, पुढील काळात याविषयी आणखी माहिती देणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. 'मां इंटी बंगारम' चित्रपटाला प्रेक्षकांचे भरपूर प्रेम मिळाले आहे. हा चित्रपट थेट मनाला भिडला असल्याचे राज यांनी सांगितले आहे. नंदिनी रे•ïr यांच्या दिग्दर्शनात तयार या चित्रपटात समांथा रुथ प्रभू यांच्यासोबत गुलशन देवैया, श्रीमुखी आणि दिगंत मंचले दिसून आले आहेत. या चित्रपटाची निर्मिती समांथा, राज निदिमोरु आणि हिमांशू यांनी मिळून केली आहे. या चित्रपटात आतापर्यंत बॉक्स ऑफिसवर 50 कोटी रुपयांची कमाई केली आहे. 1980 च्या काळावर आधारित या कहाणीत समांथाने 'स्वर्णा'ची भूमिका साकारली आहे, जी स्वतःच्या परिवाराच्या मर्जीच्या विरोधात एका डॉक्टरसोबत विवाह करते. प्रारंभी तिला सासरी प्रेम मिळत नाही, परंतु हळूहळू ती सर्वांची मने जिंकत नाही. परंतु तेव्हाच तिचा भूतकाळ परतून तिच्या जीवनात उलथापालथ घडवू लागतो. समांथाने अलिकडेच प्रेग्नंसीची घोषणा केली असून ती काही काळासाठी मॅटर्निटी ब्रेक घेणार आहे. समांथा आणि राज निदिमोरु यांचा विवाह डिसेंबर महिन्यात कोईम्बतूर येथील ईशा योग सेंटरमध्ये झाला होता.

# अल्लू अर्जुनसोबत पुन्हा झळकणार रश्मिका



पुष्पा चित्रपटात रश्मिका मंदाना आणि अल्लू अर्जुन यांच्या जबरदस्त केमिस्ट्रीला प्रेक्षकांची मोठी पसंती मिळाली होती. आता ही जोडी 'राका' चित्रपटात पुन्हा एकत्र दिसून येणार आहे. रश्मिका यात महत्त्वाची भूमिका साकारणार असल्याचे समजते. दिग्दर्शक एटलीच्या या चित्रपटावरून सध्या मोठी चर्चा सुरू आहे. या चित्रपटात रश्मिकासोबत मृणाल ठाकूर आणि जान्हवी कपूरही महत्त्वाच्या भूमिकेत दिसून येऊ शकते. शाहरुख खान या चित्रपटात कॅमियो करण्याची शक्यता आहे. या चित्रपटाचे पोस्टर यापूर्वीच निर्मात्यांनी जारी केले आहे. या पोस्टरमध्ये अल्लू अर्जुनचा चेहरा फरमागे आंशिक स्वरूपात दडलेला दिसून येतो, ज्यात त्याचा लूक अत्यंत वाइल्ड आणि दमदार दाखविण्यात आला आहे. 'राका' चित्रपटाचे बजेट 700 कोटी रुपयांहून अधिक असणार असून, हा भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक मानला जात आहे. या चित्रपटाची निर्मिती सन पिक्चर्सकडून करण्यात येत असून मुंबईत मोठ्या प्रमाणावर त्याचे चित्रिकरण पार पडणार आहे. अत्याधुनिक व्हिज्युअल इफेक्ट्स, भव्य ॲक्शन सीक्वेन्स आणि दमदार स्टारकास्टमुळे या चित्रपटाबाबत चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. निर्माते हा चित्रपट पुढील वर्षी प्रदर्शित करण्याची योजना आखत असून, बॉक्स ऑफिसवर नवे विक्रम प्रस्थापित करण्याचीही अपेक्षा व्यक्त केली जात आहे. 'राका' हा चित्रपट केवळ स्टारकास्टमुळेच नव्हे, तर त्याच्या भव्यदिव्य निर्मितीमूल्यांमुळेही चर्चेचा विषय ठरत आहे. ॲक्शन, व्हिज्युअल इफेक्ट्स आणि दमदार कथानकाचा संगम या चित्रपटात पाहायला मिळणार असल्याची चर्चा आहे. अल्लू अर्जुनच्या नव्या लूकबाबत चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता असून, चित्रपटाच्या प्रत्येक अपडेटला मोठा प्रतिसाद मिळत आहे. अनेक मोठ्या कलाकारांच्या उपस्थितीमुळे 'राका' हा पॅन इंडिया स्तरावरील सर्वात बहुप्रतीक्षित चित्रपटांपैकी एक मानला जात आहे. त्यामुळे बॉक्स ऑफिसवरही हा चित्रपट नवे विक्रम प्रस्थापित करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# नाशिकच्या श्रावणी सांगळेची कमाल

## चीनमधील आशियाई २३ वर्षांआतील स्पर्धेत तीन पदकांची धमाल!

**महाईन्यूज । नाशिक**

**चीनमधील ऑर्डोस येथे आयोजित पहिल्या आशियाई २३ वर्षांआतील ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये नाशिकच्या श्रावणी सांगळेने दोन सुवर्ण आणि एक कांस्यपदक अशा तीन पदकांची कमाई करून ऐतिहासिक कामगिरी केली आहे.**

मिश्र (मिक्स्ड) ४×४०० रिले प्रकारात भारतीय संघाने सुवर्णपदक पटकावले. अंतिम फेरीत भारतीय संघ चीनमागे होता. मात्र शेवटच्या (अँकर) टप्प्यात श्रावणीने अफाट वेगाने चीनच्या धावपटूला मागे टाकले. आणि भारताच्या सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केले. अस्तिक प्रधान, सँड्रामोल साबू, सेतू मिश्रा आणि श्रावणी सांगळे यांचा समावेश असलेल्या भारतीय संघाने ३:१८.६४ सेकंद वेळेसह सुवर्ण जिंकले.

भारताने चीनचा अवघ्या ०.१० सेकंदांनी पराभव केला. त्यानंतर महिलांच्या ४०० मीटर अडथळा शर्यतीत श्रावणीने ५८.०९ सेकंद अशी तिची सर्वोत्तम वेळ नोंदवत वैयक्तिक कांस्यपदक पटकावले. महिलांच्या ४x४०० मीटर रिले प्रकारात भारताच्या संघाने सुवर्णपदकाचा वेध घेतला. यामध्येही श्रावणीने मोलाचे योगदान दिले. या तीन पदकासह श्रावणीने मानाच्या या स्पर्धेत पदकांची हॅट्रिक केली. याआधी ॲथलेटिक्समध्ये नाशिकच्या खेळाडूंचा लांब पल्ल्यांच्या शर्यतीत दबदबा होता. आता श्रावणीच्या माध्यमातून नाशिकचे कमी पल्ल्याच्या शर्यतीतही वर्चस्व निर्माण होत आहे.

श्रावणीने यापूर्वीही आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्यातील गुणवत्तेची चुणूक दाखवली आहे. चेन्नई येथे २०२४ मध्ये आयोजित चौथ्या दक्षिण आशियाई कनिष्ठ ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये श्रावणीने सुवर्णपदक पटकावले होते. त्याचवेळी श्रावणीकडून अधिक चांगल्या कामगिरीची अपेक्षा निर्माण झाली होती. ती अपेक्षा तिने फोल ठरु दिली नाही. आणि आशियाई २३ वर्षांआतील ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये देशाला तीन पदकांची कमाई करुन दिली.

श्रावणी अनेक वर्षांपासून नाशिकमध्ये भारतीय ॲथलेटिक्स प्रशिक्षक वैजनाथ काळे यांच्या शास्त्रशुद्ध मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहे. तिच्या यशात प्रशिक्षक काळे यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. श्रावणी चीनमधील स्पर्धेसाठी रवाना होण्याआधीच वैजनाथ काळे यांनी श्रावणी ही चीनच्या ट्रॅकवर सर्वोत्तम कामगिरी करुन पदकांची हॅट्रिक करेल, असा विश्वास व्यक्त केला होता. श्रावणीने आपल्या प्रशिक्षकांचा विश्वास सार्थ ठरविला.

नाशिकमधील धावपटूंना सावरपाडा एक्स्प्रेस कविता राऊतने मिळविलेल्या यशामुळे एक ऊर्जा मिळाली. आणि तेव्हांपासून अनेक धावपटूंनी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या कामगिरीची छाप सोडली. आता त्या पंक्तीत श्रावणी सांगळेचे नाव आले आहे. श्रावणीकडून आता नाशिकच्या क्रीडाप्रेमींच्या अपेक्षा अधिकच वाढल्या आहेत.




## भारताच्या लेकींचा क्रिकेटच्या पंढरीत ऐतिहासिक कसोटी विजय!

**महाईन्यूज । लंडन**

**१४२ वर्षांत पहिल्यांदाच क्रिकेटची पंढरी म्हटल्या जाणाऱ्या लॉर्ड्सच्या मैदानावर पहिल्यांदाच खेळण्यात आलेल्या कसोटी सामन्यात भारताच्या महिला संघाने दणदणीत विजय नोंदवला. भारत आणि इंग्लंड महिला संघांमधील या एकमेव कसोटी सामन्यात टीम इंडियाच्या लेकींनी पहिल्या डावापासूनच आपली पकड मजबूत ठेवली. अखेरीस कसोटीच्या चौथ्या दिवशी भारतीय संघाने २ धावांनी दमदार विजय मिळवला. यासह लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानावर कसोटी सामना जिंकणारा जगातील भारत हा पहिला महिला संघ ठरला.**




यास्तिका भाटिया, क्रांती गौड व स्मृती मानधना भारताच्या या विजयाच्या शिल्पकार ठरल्या. याशिवाय भारताच्या प्रत्येक खेळाडूने आपली जबाबदारी चोख बजावत भारताच्या या ऐतिहासिक कसोटी विजयात मोलाची भूमिका बजावली. भारताच्या गोलंदाजांचं या विजयात मोठं योगदान आहे. भारताचा हा ऐतिहासिक विजय पाहण्यासाठी आणि संघाचं खास कौतुक करण्यासाठी लॉर्ड्स स्टेडियममध्ये सचिन तेंडुलकर, आयसीसी चेअरमन जय शाह व बीसीसीआयचे देवजीत सैकिया ही मंडळी उपस्थित होती.

नताली सायव्हर ब्रंटच्या नेतृत्त्वाखालील इंग्लंड महिला संघाने नाणेफेक जिंकत गोलंदाजीचा निर्णय घेतला आणि प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या भारतीय संघाने पहिल्या डावात २८५ धावा केल्या आणि इंग्लंडचा संघ प्रत्युत्तरात १७० धावांवर सर्वबाद झाला. यासह टीम इंडियाला ११५ धावांची आघाडी मिळाली, तर दुसऱ्या डावात यस्तिका भाटियाच्या विक्रमी शतकी खेळीच्या बळावर टीम इंडियाने ३४१ धावा करत डाव घोषित केला आणि इंग्लंडला विजयासाठी ४५७ धावांचं मोठं आव्हान दिलं. प्रत्युत्तरात इंग्लंडचा संघ १८६ धावा करत सर्वबाद झाला.


भारताने विजयासाठी दिलेल्या ४५७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडचे टॉप-५ फलंदाज स्वस्तात माघारी परतले. क्रांती गौड, सायली सातघरे व स्नेह राणा यांनी इंग्लंडला धाव करण्याची संधी दिली नाही. यष्टीरक्षक ॲमी जोन्स व गोलंदाज सोफी एक्सलस्टन यांनी अर्धशतकी खेळी केल्या. तर मॅडी विलियर्सने २६ धावांचं योगदान दिलं. तर भारताकडून स्नेह राणाने दुसऱ्या डावात ४ विकेट्स घेतल्या. तर सायली सातघरे, क्रांती गौड व दीप्ती शर्मा यांनी २-२ विकेट्स घेतल्या.

स्मार्ट PCMC
SMART CITY
epaper.mahaenews.com
# महाईन्यूज™
ePaper
। मंगळवार ।
दि. 14 जुलै 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## चौकशीपूर्वी तथ्यहीन दावे निष्कर्ष योग्य आहेत का? दावे आणि वस्तुस्थितीचा आढावा

MahENews Fact Check

# मोशी दुर्घटना : नैसर्गिक आपत्तीतवरुन राजकीय आरोप आणि वास्तव?



**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी कचरा डेपो दुर्घटनेनंतर विविध राजकीय पक्ष आणि संघटनांकडून महापालिका प्रशासन व सत्ताधाऱ्यांवर गंभीर आरोप करण्यात येत आहेत. काही माध्यमांमधूनही या दुर्घटनेसाठी थेट भ्रष्टाचार, निष्क्रिय प्रशासन आणि राजकीय हस्तक्षेपाला जबाबदार धरले जात आहे. मात्र, या दाव्यांमागील तथ्य काय सांगतात, याचा आढावा घेणे आवश्यक आहे.**



### दावा क्र. १

**दुर्घटना केवळ भ्रष्टाचारामुळेच झाली.**

**FACT CHECK**

**चौकशीपूर्वी असा निष्कर्ष काढणे योग्य नाही.**

दुर्घटनेची अधिकृत चौकशी सुरू आहे. कचऱ्याचा ढिगारा कोसळण्यामागे मुसळधार पाऊस, भू-स्थैर्य, तांत्रिक त्रुटी, सुरक्षा व्यवस्थेतील कमतरता किंवा इतर कारणांचा किती वाटा होता, हे चौकशी अहवालानंतरच स्पष्ट होणार आहे. सध्या कोणत्याही एका कारणाला अंतिम जबाबदार ठरविणे वस्तुनिष्ठ ठरत नाही. या दुर्घटनेचे ज्यांना राजकारण करायचे आहे, हे अत्यंत असंवेदनशीलतेचे लक्षण आहे.

### दावा क्र. २

**महापालिकेने कोणतेही बचावकार्य केले नाही.**

**FACT CHECK**

**दावा दिशाभूल करणारा.**

दुर्घटनेनंतर महापालिका, अग्निशमन दल, पोलीस, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF) आणि इतर यंत्रणांनी संयुक्तपणे बचावकार्य केले. प्रतिकूल हवामान, अस्थिर कचऱ्याचा ढिगारा आणि सुरक्षिततेच्या कारणांमुळे कामाचा वेग मर्यादित राहिला असू शकतो; मात्र "कोणतेही बचावकार्य झाले नाही" असा दावा उपलब्ध माहितीशी सुसंगत नाही.

### दावा क्र. ३

**बायोमायनिंग आणि वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प पूर्णपणे अपयशी ठरले.**

**FACT CHECK**

**अपूर्ण दावा.**

या प्रकल्पांमुळे काही प्रमाणात कचऱ्यावर प्रक्रिया झाली आहे. प्रकल्पांची कार्यक्षमता, उद्दिष्टपूर्ती आणि उर्वरित कचऱ्याचे व्यवस्थापन याबाबत स्वतंत्र तांत्रिक मूल्यांकन आवश्यक आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकल्पच अपयशी ठरल्याचा निष्कर्ष पुराव्याशिवाय देता येत नाही.

### दावा क्र. ४

**नियमांचे उल्लंघन झाल्यामुळेच दुर्घटना घडली.**

**FACT CHECK** **चौकशी सुरू आहे.**

इमारतीच्या परवानग्या, बांधकामातील नियमांचे पालन, सुरक्षा निकष आणि प्रकल्प व्यवस्थापनाची जबाबदारी यासंदर्भातील तपशील अधिकृत चौकशीत स्पष्ट होतील. संबंधित संस्थांवर जबाबदारी निश्चित होण्यापूर्वी अंतिम निष्कर्ष काढणे उचित नाही. कारण, आयुक्तांनी संबंधित ठेकेदार कंपनीला नोटीस काढली आहे किंबहुना अँथनी लारा या कंपनीवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिलेले आहेत.

### दावा क्र. ५

**सर्व दोष सत्ताधाऱ्यांचाच आहे.**

**FACT CHECK** **एकांगी निष्कर्ष.**

मोठ्या पायाभूत प्रकल्पांमध्ये प्रशासन, कंत्राटदार, तांत्रिक सल्लागार, देखरेख यंत्रणा आणि नियामक संस्था अशा अनेक घटकांची भूमिका असते. चौकशी पूर्ण झाल्यानंतरच कोणाची जबाबदारी किती आहे, हे निश्चित होऊ शकते. मात्र, त्यासाठी विशिष्ट राजकीय उद्देशाने सत्ताधारी किंवा प्रशासनाला दोषी ठरवणे संयुक्तीक नाही.

**मोशी दुर्घटना ही प्रशासकीय, तांत्रिक आणि मानवी पैलू असलेली घटना आहे. नियमांचे पालन झाले का, परवानग्या योग्य होत्या का, प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सूचनांची अंमलबजावणी झाली का आणि कोणाची जबाबदारी निश्चित होते, याचा अंतिम निर्णय अधिकृत चौकशी अहवालानंतरच होऊ शकतो. त्यामुळे तथ्य आणि राजकीय आरोप यांच्यात स्पष्ट भेद ठेवणे ही जबाबदारीने प्रत्येकाने व्यक्त होण्याची गरज आहे.**




# मोशी दुर्घटना : नैसर्गिक आपत्तीतवरुन राजकीय आरोप आणि वास्तव?

## चौकशीपूर्वी तथ्यहीन दावे निष्कर्ष योग्य आहेत का? दावे आणि वस्तुस्थितीचा आढावा

### दावा क्र. ६

**कचरा डेपोच्या अवघ्या ३० मीटर अंतरावर इमारत बांधण्यात आली.**

FACT CHECK

**अधिकृत नकाशे आणि मोजमापांची पडताळणी आवश्यक.**

घटनेनंतर इमारतीचे डेपोपासूनचे अंतर आणि बफर झोनबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. मात्र, हे अंतर अधिकृत सर्व्हे, मंजूर आराखडे आणि महसूल नोंदींच्या आधारेच निश्चित होऊ शकते. चौकशीपूर्वी निश्चित निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही.

### दावा क्र. ७

**बफर झोनच्या नियमांचे उल्लंघन झाले.**

FACT CHECK

**संभाव्य प्रश्न; अंतिम निष्कर्ष नाही.**

घनकचरा व्यवस्थापन नियमांनुसार लँडफिल परिसरातील सुरक्षितता, पर्यावरणीय संरक्षण आणि विकासासंदर्भात तरतुदी आहेत. मात्र, संबंधित प्रकल्पासाठी कोणत्या अटी लागू होत्या, कोणत्या परवानग्या देण्यात आल्या आणि त्यांचे पालन झाले का, हे अधिकृत नोंदी तपासल्यानंतरच स्पष्ट होईल. पण, सदर इमारत ही कचरा डेपोची अॅडमिन बिल्डींग होती. त्यामुळे प्रकल्पाची इमारत ही डेपोवरच उभारावी लागणार हे लक्षात घेतले पाहिजे.

### दावा क्र. ८

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नोटिशीकडे दुर्लक्ष करण्यात आले.**

FACT CHECK

**नोटीस असल्यास ती तथ्य; मात्र पालन झाले की नाही, याची पडताळणी आवश्यक.**

प्रदूषण नियंत्रण मंडळाने सूचना किंवा नोटीस दिली असल्यास ती नोंदवहीतील बाब आहे. परंतु त्या सूचनांवर महापालिकेने कोणती कार्यवाही केली, किती अंमलबजावणी झाली आणि कोणत्या बाबी प्रलंबित राहिल्या, याचा निर्णय अधिकृत पत्रव्यवहार आणि चौकशीनंतरच होऊ शकतो. त्यापूर्वीच आरोप करणे अयोग्य आहे.

### दावा क्र. ९

**शंभर टक्के कचऱ्यावर प्रक्रिया झाली नाही.**

FACT CHECK

**मोशी येथे अद्याप मोठ्या प्रमाणावर कचरा साठा असल्याचे सर्वमान्य आहे.**

मोशी कचरा डेपोवर १९८२ पासून कचरा साठवला जात होता. वेस्ट टू एनर्जी हा प्रकल्प २०१९ मध्ये सुरू झाला. शहरात नियमित सुमारे १५०० टन कचरा निर्माण होतो. वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाची क्षमता ७०० मेट्रीक टन इतकी आहे. म्हणजे ८०० टन कचरा अतिरिक्त साठवला जातो. आता डेपोमध्ये बायोमायनिंग, सीएन्डडी वेस्ट, हॉटेल वेस्ट पासून बायोगॅस असे प्रकल्प आहेत. मात्र, "लीगसी वेस्ट" प्रचंड आहे. किंबहुना ४० वर्षांपासून साठवलेला कचरा आहे. त्यामुळे संपूर्ण कचऱ्यावर प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. त्यामुळे प्रक्रिया सुरू असूनही मोठ्या प्रमाणात कचरा शिल्लक असल्याचे वास्तव आहे. मात्र, यावरून प्रकल्प पूर्णपणे अपयशी ठरल्याचा निष्कर्ष काढता येत नाही.

### दावा क्र. १०

**खासदार, आमदार आणि लोकप्रतिनिधी जबाबदार आहेत.**

FACT CHECK

**राजकीय मत; सिद्ध झालेला तथ्यात्मक निष्कर्ष नाही.**

लोकप्रतिनिधींनी पुरेशी देखरेख केली का, हा सार्वजनिक चर्चेचा विषय असू शकतो. मात्र, कायदेशीर किंवा प्रशासकीय जबाबदारी निश्चित करण्यासाठी अधिकृत चौकशी, पुरावे आणि संबंधित कायदेशीर प्रक्रिया आवश्यक असते. केवळ प्रश्न उपस्थित झाल्यामुळे जबाबदारी सिद्ध होत नाही. त्यामुळे राजकीय उद्देशाने होणारे आरोपी निराधार आणि संधीसाधुपणाचे आहेत.

### दावा क्र. ११

**मोशी डेपोमध्ये सर्व नियम पायदळी तुडवले.**

FACT CHECK

**अतिशयोक्तीपूर्ण आणि अद्याप अप्रमाणित दावा.**

दुर्घटनेनंतर अनेक त्रुटींबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. मात्र, "सर्व नियम मोडले" असा व्यापक निष्कर्ष अधिकृत तपास पूर्ण होण्यापूर्वी देता येत नाही. चौकशी अहवालात कोणत्या नियमांचे उल्लंघन झाले, जबाबदार कोण आणि त्याचे परिणाम काय, हे स्पष्ट होणे अपेक्षित आहे. मोशी दुर्घटना अत्यंत गंभीर आणि वेदनादायी आहे. मृतांच्या कुटुंबीयांना न्याय मिळालाच पाहिजे आणि दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. मात्र, चौकशी पूर्ण होण्यापूर्वी राजकीय आरोपांना अंतिम सत्य मानणे योग्य ठरत नाही. वस्तुनिष्ठ पत्रकारितेच्या दृष्टीने अधिकृत अहवाल, तांत्रिक निष्कर्ष आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारेच जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

# पीसीयू मध्ये आंतरराष्ट्रीय मास्टरमाइंड मीटचे उद्घाटन

## भारताच्या प्रगतीसाठी संशोधनावर लक्ष; पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**भारताच्या औद्योगिक, आर्थिक प्रगतीसाठी नवोपक्रम व संशोधनावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. आगामी काळात पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) हे स्टार्टअप केंद्रित विद्यापीठ म्हणून विकसित करण्यात येईल. तसेच हरित ऊर्जा, हवामान बदल, शाश्वत शेती, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जागतिक सहकार्य या क्षेत्रात संशोधन करून आव्हानांचे संधी मध्ये रूपांतर करून स्टार्टअपला चालना दिली जाईल. तसेच भारत – जपान सहकार्य माध्यमातून विकसित भारत २०४७ चे स्वप्न साकार होण्यास मदत होईल असे प्रतिपादन पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी केले.**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठात (पीसीयू) येथे 'आंतरराष्ट्रीय मास्टरमाइंड मीट (आयएम ३)–२०२६' च्या उद्घाटन प्रसंगी हर्षवर्धन पाटील बोलत होते. विकसित भारत २०४७ या संकल्पनेला संशोधन आणि नव उपक्रम या माध्यमातून गती देण्यासाठी आयोजित परिषदेत कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे, संशोधन व विकास संचालक तसेच डॉ. भरत काळे, सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्कचे महासंचालक डॉ. राजेंद्र जगदाळे, मायक्रोलिन (अमेरिका) चे संस्थापक डॉ. अशोक जोशी आणि युनिव्हर्सिटी ऑफ न्यूकॅसल, ऑस्ट्रेलिया येथील ग्लोबल इनोव्हेटिव्ह सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड नॅनोमटेरियल्सचे संचालक प्रा. अजयन विनू , मिड स्वीडन विद्यापीठाचे डॉ. कौस्तुभ दलाल, सेंट्रल इलेक्ट्रोकेमिकल रिसर्च इन्स्टिट्यूटचे संचालक प्रा. विजय मोहनन पिल्लई, भारतीय विज्ञान संस्था, बेंगळुरू येथील प्रा. पी. एस. अनिल कुमार, टाटा केमिकल्सचे ग्लोबल हेड इनोव्हेशन डॉ. रिचर्ड लोबो, सी-डॅकचे डॉ. कृष्णांजन भट्टाचार्य, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे डॉ. विलास खरचे, दक्षिण आफ्रिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ व्हेंडा येथील डॉ. फुलुफ्हेलो नेमांगवेले, भारतीय विज्ञान संस्थेचे डॉ. सचिन रोंडिया आदींसह देश विदेशातील नामवंत शास्त्रज्ञ, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, उद्योग प्रतिनिधी आणि धोरणकर्ते या परिषदेत सहभागी झाले होते. यावेळी ॲबस्ट्रॅक्ट स्मरणिका प्रकाशित करण्यात आली.

कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी विद्यापीठातील संशोधन, नवोपक्रम आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी उभारण्यात आलेल्या सक्षम परिसंस्थेची माहिती देत विद्यार्थी आणि संशोधकांनी समाजोपयोगी संशोधन करण्याचे आवाहन केले.

प्रा. अजयन विनू यांनी कार्बन उत्सर्जन, हरित ऊर्जा, हायड्रोजन इंधन, स्वच्छ ऊर्जा आणि प्रगत नॅनोमटेरियल्स या विषयांवर मार्गदर्शन केले.

तांत्रिक सत्रांमध्ये डॉ. अशोक जोशी यांनी ज्ञानाचे आर्थिक मूल्यात रूपांतर करणारी प्रक्रिया म्हणजे नवोपक्रम असून, तो देशाच्या अर्थव्यवस्था वाढीसाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगितले. सेंट्रल इलेक्ट्रोकेमिकल रिसर्च इन्स्टिट्यूटचे संचालक प्रा. विजय मोहनन पिल्लई यांनी ऊर्जा साठवणूक, द्विमितीय पदार्थ, इलेक्ट्रोकॅटलिसिस, लिथियम-आयन बॅटरी, बॅटरी कचरा आणि स्वच्छ ऊर्जेतील आव्हाने यावर मार्गदर्शन केले.

प्रा. अजयन विनू यांनी प्रगत सच्छिद्र कार्बन आधारित पदार्थ, हायड्रोजन निर्मिती, कार्बन डायऑक्साइड नियंत्रण आणि पर्यावरणपूरक ऊर्जा उपाय यावरील संशोधन सादर केले.

भारतीय विज्ञान संस्था, बेंगळुरू येथील प्रा. पी. एस. अनिल कुमार यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने क्वांटम पदार्थांचे अभियांत्रिकीतील संशोधन, मशीन लर्निंगचा वापर आणि आधुनिक इलेक्ट्रॉनिक उपकरणांसाठी आवश्यक प्रगत पदार्थ विकास याविषयी माहिती दिली.

टाटा केमिकल्सचे ग्लोबल हेड, इनोव्हेशन डॉ. रिचर्ड लोबो यांनी जबाबदार कृत्रिम बुद्धिमत्ता, संशोधनातील नवे प्रवाह आणि २०३५ पर्यंतच्या तांत्रिक परिवर्तनाची माहिती दिली.

मिड स्वीडन विद्यापीठाचे डॉ. कौस्तुभ दलाल यांनी आरोग्य सेवेमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या गुंतवणुकीचे आर्थिक मूल्यांकन, त्यातील आव्हाने आणि संधी स्पष्ट केल्या. सी-डॅकचे डॉ. कृष्णांजन भट्टाचार्य यांनी भाषा मॉडेल्स मधील डेटा करप्शन आणि त्यावरील उपाय याची माहिती दिली.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे डॉ. विलास खरचे यांनी अचूक शेती, पीक निरीक्षण, हवामान बदलाशी सुसंगत शेती, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्मार्ट कृषी तंत्रज्ञान वापर याचे मार्गदर्शन केले.

दक्षिण आफ्रिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ व्हेंडा येथील डॉ. फुलुफ्हेलो नेमांगवेले यांनी ब्लॉकचेन आधारित हरित ऊर्जा प्रणाली, ऊर्जा देवाण घेवाण, मशीन लर्निंग आधारित ऊर्जा अंदाज प्रणाली यावर सादरीकरण केले.

भारतीय विज्ञान संस्थेचे डॉ. सचिन रोंडिया यांनी सौरऊर्जा निर्मितीसाठी प्रगत सेमिकंडक्टर पदार्थ, फोटोव्होल्टाइक तंत्रज्ञान आणि पुढील पिढीतील सौरऊर्जा संशोधनातील संधी याची माहिती दिली.

ही आंतरराष्ट्रीय परिषद पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. प्रास्ताविक डॉ. भरत काळे यांनी केले.

# डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट आकुर्डीच्या वतीने 'निर्मल वारी सेवा २०२६' उपक्रम यशस्वी!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**आषाढी वारीच्या पावन पर्वानिमित्त डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन अँड मॅनेजमेंट (DYPIMCAM), आकुर्डी येथील विद्यार्थी व प्राध्यापकांनी 'निर्मल वारी सेवा २०२६' या सामाजिक उपक्रमात अत्यंत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. 'इग्नायटेड युथ फोरम' (IYF) यांच्या सहकार्याने आणि डी. वाय. पाटील शैक्षणिक संकुल, आकुर्डी यांच्या समाजसेवेच्या समृद्ध परंपरेला अनुसरून हा उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आला.**




या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी प्रत्यक्ष वारी मार्गावर उतरून सक्रिय सहभाग घेतला. तरुण स्वयंसेवकांनी वारीमध्ये सहभागी झालेल्या लाखो वारकऱ्यांमध्ये वैयक्तिक स्वच्छता (Hygiene) आणि परिसर स्वच्छतेबाबत प्रभावी जनजागृती केली. विविध फलक आणि घोषणांच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश प्रसारित करण्यात आला. तसेच, वारी व्यवस्थापनात प्रशासनाला सहकार्य करत वारकऱ्यांना आवश्यक ती मदत आणि वैद्यकीय साहाय्य पुरवून विद्यार्थ्यांनी समाजसेवेचा एक आदर्श समाजासमोर ठेवला.

या सेवाकार्यादरम्यान सहभागी विद्यार्थ्यांनी आपल्यातील सेवाभाव, शिस्त, सामाजिक उत्तरदायित्व, संघभावना (Teamwork) आणि नेतृत्वगुण यांचे उत्कृष्ट दर्शन घडविले. तंत्रज्ञानाचे शिक्षण घेणाऱ्या या तरुणांनी प्रत्यक्ष जमिनीवर उतरून केलेले हे कार्य कौतुकास्पद ठरले. या उपक्रमातून वारीच्या पवित्र वातावरणात स्वच्छता, आरोग्य, सामाजिक जाणीव आणि मानवतेचा संदेश वारकरी व नागरिकांपर्यंत अत्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आला "डी. वाय. पाटील शैक्षणिक संकुलाची समाजसेवेची परंपरा खूप मोठी आहे. वारीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना मिळालेली ही सेवा करण्याची संधी त्यांच्यात सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणारी आहे. विद्यार्थ्यांनी अत्यंत शिस्तीत आणि उत्साहाने हे कार्य पार पाडले."

### महाविद्यालय प्रशासन

या यशस्वी उपक्रमाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने सहभागी सर्व विद्यार्थी स्वयंसेवक व प्राध्यापकांचे विशेष कौतुक व अभिनंदन करण्यात आले. समाजसेवा, स्वच्छता आणि सामाजिक उत्तरदायित्वाची मूल्ये जपणारा हा उपक्रम वारकरी तसेच स्थानिक नागरिकांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरला आहे.

# 'आरकेएल गॅलेक्सी'च्या विश्वजीत पवार आणि वेदार्थ तापकीरची आंतरराष्ट्रीय सिलांबम स्पर्धेसाठी निवड!

## मलेशियातील जागतिक स्पर्धेत करणार भारताचे प्रतिनिधित्व; क्रीडा जगतातून कौतुकाचा वर्षाव

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**येथील नामांकित 'आरकेएल गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूल'*च्या दोन गुणवंत विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात थेट जागतिक पातळीवर झेप घेतली आहे. शाळेतील विश्वजीत पवार आणि वेदार्थ सचिन तापकीर या दोन विद्यार्थ्यांची 'सिलांबम स्पोर्ट्स फेडरेशन (इंडिया)' कडून आगामी 'आंतरराष्ट्रीय सिलांबम चॅम्पियनशिप २०२६' साठी भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी अधिकृत निवड झाली आहे. ही निवड पुण्याच्या क्रीडा आणि शैक्षणिक क्षेत्रासाठी अत्यंत अभिमानास्पद बाब ठरली आहे.**



या ऐतिहासिक यशामागे विद्यार्थ्यांचे अहोरात्र कष्ट आणि त्यांचे कोच रविराज चकाले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. त्यांच्या उत्कृष्ट कोचिंग, रणनीतिक प्रशिक्षण आणि कठोर परिश्रमांमुळेच या विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर झेप घेता आली. त्यांच्या या यशाबद्दल संपूर्ण शाळा प्रशासनाने कोच रविराज चकाले आणि क्रीडा विभागाचे विशेष कौतुक केले आहे.

ही प्रतिष्ठेची आंतरराष्ट्रीय स्पर्धा १ आणि २ ऑगस्ट २०२६ या कालावधीत मलेशियातील पेनांग येथील 'युनिव्हर्सिटी सायन्स मलेशिया' (USM) येथे पार पडणार आहे. या जागतिक मंचावर हे दोन्ही तरुण खेळाडू आपल्या मार्शल आर्ट्स कौशल्याचे प्रदर्शन घडवतील आणि आपली शाळा, राज्य तसेच देशाचे नाव उंचावतील.

आरकेएल गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूल नेहमीच केवळ पुस्तकी ज्ञानाऐवजी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देते. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी शाळा सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत असते.

क्रीडा क्षेत्र (Sports): शाळेमध्ये सिलंबम सोबतीलाच स्विमिंग, कराटे, बास्केटबॉल, फुटबॉल, क्रिकेट, स्केटिंग, बॉक्सिंग आणि जिम्नॅस्टिक यांसारख्या विविध खेळांचे व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते.

सांस्कृतिक आणि तांत्रिक क्षेत्र (Co-curricular): खेळांव्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी थिएट्रिका (Theatrica/ नाट्यशास्त्र), डान्स (नृत्य) आणि रोबोटिक्स (Robotics) चे अद्ययावत शिक्षण दिले जाते.

संगीत क्षेत्र (Music): संगीत विभागात विद्यार्थ्यांना तबला, गिटार आणि क्लॅपबॉक्स (Clapbox) यांसारखी वाद्ये वाजवण्याचे विशेष प्रशिक्षण दिले जाते.

### सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव

ही आंतरराष्ट्रीय निवड म्हणजे शाळेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे, दर्जेदार उपक्रमांचे आणि दूरदृष्टीचे फळ आहे. या ऐतिहासिक टप्प्याबद्दल शाळेचे व्यवस्थापन, प्राचार्य, शिक्षक आणि पालकांनी विश्वजीत आणि वेदार्थचे कौतुक केले असून, मलेशियात भारतासाठी सुवर्णपदक जिंकण्यासाठी त्यांना मनापासून शुभेच्छा दिल्या आहेत.

"विश्वजीत आणि वेदार्थची आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेली निवड हा आरकेएल गॅलेक्सी स्कूलच्या संपूर्ण परिवारासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. आमच्या विद्यार्थ्यांनी केवळ शाळेचेच नव्हे, तर देशाचे नाव जागतिक नकाशावर कोरले आहे. कठोर परिश्रम आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर कोणतीही उंची गाठता येते, हे या दोघांनी सिद्ध केले. मलेशियातील या स्पर्धेत त्यांनी सुवर्णपदक जिंकून देशाचा तिरंगा फडकवावा, याच आमच्या त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा आहेत. शाळा व्यवस्थापन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.

**- डॉ. पुष्कर चौबे, चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर (CEO), आरकेएल गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूल.**

"आरकेएल गॅलेक्सी स्कूलमध्ये आम्ही केवळ पुस्तकी ज्ञानावर भर न देता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला नेहमीच प्राधान्य देतो. जागतिक दर्जाच्या क्रीडा सुविधा आणि तज्ज्ञ प्रशिक्षकांमुळेच आज आमचे विद्यार्थी आंतरराष्ट्रीय पातळीवर झेप घेऊ शकले आहेत. विश्वजीत आणि  वेदार्थचे हे यश इतर सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. कोच रविराज चकाले आणि क्रीडा विभागाचे नियोजनबद्ध कष्ट आज फळाला आले आहेत. या दोन्ही गुणी खेळाडूंना पुढील प्रवासासाठी अनेक शुभेच्छा!

**- मित्तल शहा, चीफ ऑपरेशन्स ऑफिसर (COO), आरकेएल गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूल.**

# Priyadarshani School, Moshi Holds Grand Investiture Ceremony

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE



**Priyadarshani School, Moshi** proudly organized its Investiture Ceremony to officially confer leadership responsibilities upon the newly elected Student Council for the academic year. The ceremony commenced with the lighting of the ceremonial lamp, followed by the oath-taking administered to the student leaders. The young office bearers pledged to uphold the values of discipline, integrity, responsibility, and service towards the school community.

The Principal congratulated the newly elected council members and encouraged them to lead by example with confidence, dedication, and humility. The Management extended their best wishes and emphasized that true leadership is built on commitment, teamwork, and respect for others. Parents, teachers, and students witnessed the inspiring ceremony with great enthusiasm.

The event concluded with the National Anthem, marking the beginning of a new chapter of student leadership at Priyadarshani School, Moshi.